31 MAY 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

आय विटनेस

# ‘महाराष्ट्र के रंग पंजाब के संग’




कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात सोमवारी ‘महाराष्ट्र के रंग पंजाब के संग’ या सांस्कृतिक आदान प्रदान कार्यक्रमात पंजाबच्या लव्हली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भांगडा नृत्य सादर केले. (छाया : नसीर अत्तार)

लोकमत

# 'कुठेही शिका, पण देशकार्यासाठी सदैव तयार रहा'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी जगाच्या पाठीवर कुठेही शिकावे, मात्र आयुष्यात देशकार्यासाठी सदैव सज्ज राहावे, असे आवाहन फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विद्याशाखेचे वरिष्ठ अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल यांनी केले. आजादी का अमृत महोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव अशा संयुक्त निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग' या सांस्कृतिक आदानप्रदान उपक्रमाच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. लखनपाल म्हणाले, विद्यार्थ्यांनी देशासमोरील समस्यांवर विविध उपाय शोधण्यास प्राधान्य देणे गरजेचे आहे. असे उपाय घेऊन सामोरी येणारी पिढी आज देशाला हवी आहे. शिवाजी विद्यापीठाशी लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे निर्माण झालेले सांस्कृतिक बंध हे काही आजचे नाहीत. महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही राज्यांमध्ये अनेक शतकांपासून सांस्कृतिक बंध निर्माण झाले आहेत.

कुलगुरु डॉ. शिर्के यांनी प्रा. लखनपाल यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले. तर प्रा. लखनपाल यांनी मंचावरील सर्वांनाच पंजाबची फलकारी ही शाल प्रदान केली. डॉ. गुरव यांनी प्रास्ताविक, तर व्हॅलेंटिना भार्गव यांनी सूत्रसंचालन केले.

31 MAY 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जगात कुठेही शिका ; पण देशकार्यासाठी सज्ज राहा

## प्रा. लखनपाल : 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग'चे उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांनी जगाच्या पाठीवर कुठेही शिकावे. मात्र आयुष्यात देशकार्यासाठी सदैव सज्ज राहावे, असे आवाहन फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विद्याशाखेचे वरिष्ठ अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल यांनी केले.

आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरक महोत्सव अशा संयुक्त निमित्ताने आयोजित 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग' या सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. यावेळी डॉ. बलप्रीत सिंह, जी. आर. पळसे, डॉ. नीलेश सावे उपस्थित होते. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले. व्हॅलेंटिना भार्गव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रकाश कुंभार यांनी आभार मानले.




### पंजाबी लोकसंस्कृतीचे दर्शन

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात पंजाबी लोकसंस्कृती अवतरली. निमित्त होते 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग' या विशेष सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमाचे. लव्हली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'नूर-ए-इश्क' हा कव्वाली कार्यक्रम सादर केला. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र व पंजाबसह राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, गुजरात, छत्तीसगड, हरियाणा, तमिळनाडू या राज्यांतील विविध वाद्ये, नृत्ये आणि गीते असे तिहेरी सादरीकरण केले.

पुढारी

# प्रत्येक क्षेत्र नॅनो टेक्नॉलॉजीच्या कवेत : प्रा. डॉ. जाधव



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

नॅनो टेक्नॉलॉजीचे अगणित उपयोग आजही होत आहेत व यापुढेही होत राहतील. नॅनो टेक्नॉलॉजी (अतिसूक्ष्मतंत्रज्ञान) च्या उपयोगाची यादी खूप मोठी आहे. जीवशास्त्र, जैविकशास्त्र, पर्यावरणशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, बांधकाम, सौंदर्य प्रसाधने आणि इतर अनेक क्षेत्रांमध्ये करिअरच्या दृष्टीने फार मोठ्या संधी नॅनो टेक्नॉलॉजी व नॅनो सायन्समध्ये उपलब्ध आहेत. आजघडीला प्रत्येक क्षेत्र नॅनो टेक्नॉलॉजीच्या कवेत असून हे तंत्रज्ञान रोज नवनवीन क्षेत्रांत क्रांतिकारक बदल घडवत राहील, असे प्रतिपादन प्रा. डॉ सुशीलकुमार जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दै. 'पुढारी'चे सहायक सरव्यवस्थापक राजेंद्र मांडवकर होते.

दै. 'पुढारी' आयोजित एज्युदिशा प्रदर्शनात नॅनो टेक्नॉलॉली - संशोधनाची कवाडे उघडणारे शास्त्र या विषयावर विद्यार्थ्यांनामार्गदर्शनकरतानाजाधवम्हणाले, अनेकविध क्षेत्रांमध्ये नॅनो टेक्नॉलॉजी विषय घेऊन बॅचलर्स किंवा मास्टर्स अधिक पीएचडी केलेल्या विद्यार्थांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये खूप मागणी आहे. संरक्षण खाते, ऊर्जा बचत, सोलार सेल यामध्येही नॅनो तंत्रज्ञान वापरले जात असून आजच्या घडीला पोस्ट कार्डाच्या आकाराचा हार्ड ड्राईव्ह आहे. परंतु नॅनोच्या मदतीने त्यापेक्षा कित्येक पटीने लहान ड्राईव्ह लवकरच तयार होणार आहे. थोड्या जागेत अमर्याद माहितीचा साठा करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स इंडस्ट्रीत अनेक यशस्वी संशोधनांची मालिका सुरू असल्याचेही जाधव यांनी सांगितले.

मानवाच्या जीवनात आमूलाग्र बदल करणाराघटकम्हणजेनॅनोटेक्नॉलॉजी. जगातल्या प्रत्येक घटकाला नॅनो टेक्नॉलॉजीचा स्पर्श होतो आहे. नॅनो याचा अर्थ मीटरचा एक अब्जांश भाग एखाद्या पदार्थाच्या अणु-परमाणूंच्या मांडणीचा विचार करून आपल्याला हव्या त्या गुणधर्माचे पदार्थ बनवण्याची क्षमता नॅनो टेक्नॉलॉजीचं तंत्रज्ञान देऊ शकते. नॅनो गारमेंट या कपड्यांवर धूळ कमी बसते. इतकेच नाही तर नॅनो मेडिसिन, नॅनो रोबोटस् यांच्या सहाय्याने वैद्यकीय शास्त्रात आमूलाग्र बदल होत आहे आणि त्याचे दृश्य स्वरूप लवकरच पाहायला मिळेल, असेही जाधव म्हणाले.

31 MAY 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुठेही शिका, पण देशकार्यासाठी सज्ज राहा

## प्रा. सौरभ लखनपाल : 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग'चे उद्घाटन

कोल्हापूर : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी जगाच्या पाठीवर कुठेही शिकावे; मात्र आयुष्यात देशकार्यासाठी सदैव सज्ज राहावे, असे आवाहन फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विद्याशाखेचे वरिष्ठ अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल यांनी केले. आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हीरकमहोत्सव अशा संयुक्त निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग' या सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमाच्या उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



कोल्हापूर : 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग'च्या उद्घाटनप्रसंगी प्रा. सौरभ लखनपाल यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह मान्यवरांना पंजाबी फलकारी (शाल) प्रदान केली.

प्रा. लखनपाल म्हणाले, विद्यार्थ्यांनी देशासमोरील समस्यांवर विविध उपाय शोधण्याला प्राधान्य देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. असे उपाय घेऊन सामोरे येणारी पिढी आज देशाला हवी आहे. शिवाजी विद्यापीठाशी लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे निर्माण झालेले सांस्कृतिक बंध हे काही आजचे नाहीत. महाराष्ट्र आणि पंजाब या दोन्ही राज्यांमध्ये अनेक शतकांपासून सांस्कृतिक बंध निर्माण झाले आहेत. महाराष्ट्राचे संत नामदेव यांनी केलेल्या ६१ रचना पवित्र 'गुरुग्रंथसाहिब'मध्ये आहेत. गुरू गोविंदसिंहांबद्दल पंजाबमध्ये जितका आदर आहे, तितकाच छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दलही आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कोविड-१९ च्या साथीनंतर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणारा हा पहिलाच कार्यक्रम आहे. त्यामुळे या कार्यक्रमाला एक आगळे महत्त्व आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी प्रा. लखनपाल यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत केले, तर प्रा. लखनपाल यांनी मंचावरील सर्वांनाच पंजाबची फलकारी ही वैशिष्ट्यपूर्ण शाल प्रदान केली.

यावेळी मंचावर लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे उपअधिष्ठाता डॉ. बलप्रीत सिंह, जी. आर. पळसे, डॉ. नीलेश सावे उपस्थित होते. डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले.

3 1 MAY 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पंजाबी लोकसंस्कृतीच्या दर्शनाने कोल्हापूरवासीय गहिवरले!

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात अक्षरशः पंजाबी लोकसंस्कृती अवतरली आणि तिने कोल्हापूरवासीयांना नादावून सोडले, तर अखेरच्या क्षणी अगदी गहिवरूनही सोडले. निमित्त होते 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग' या विशेष सांस्कृतिक आदान-प्रदान उपक्रमाचे. शिवाजी विद्यापीठ आणि फगवाडा (पंजाब) येथील लव्हली प्रोफेशनल विद्यापीठ यांनी संयुक्तपणे हा उपक्रम आयोजित केला आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर लव्हली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'नूर-ए-इश्क' हा कव्वाली कार्यक्रम सादर केला. त्यानंतर पारंपरिक पंजाबी लोकनृत्याचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले.




**कोल्हापूर : 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग' या उपक्रमांतर्गत त्रिवेणी लोकवाद्यवृंद सादर करताना पंजाबच्या लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचा संघ.**

त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भारतीय लोकवाद्यवृंद सादर केला. यामध्ये महाराष्ट्र व पंजाबसह राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगाणा, गुजरात, छत्तीसगढ, हरियाणा, तमिळनाडू या राज्यांतील विविध वाद्ये, नृत्ये आणि गीते असे तिहेरी सादरीकरण केले. त्यानंतर पंजाबच्या संघानेही पंजाबी गीते, वाद्ये आणि नृत्य असा तिहेरी संगम साधला.

'दिल दा मामला' या प्रहसनपर लघुनाटिकेतून आजच्या वास्तवावर झगझगीत प्रकाश टाकून उपस्थितांना हसवता हसवता अंतर्मुख केले.

अखेरीस 'मैं पंजाब बोलदा' या लघु-सांगीतिकेच्या माध्यमातून पंजाबचे अत्यंत अप्रतिम आत्मवृत्त विद्यार्थ्यांनी सादर केले. पंजाबच्या या कहाणीमध्ये त्याच्या निर्मितीपासून ते धर्मनिरपेक्ष भारताच्या जडणघडणीमधील त्याचे योगदान, पंजाबने सोसलेल्या फाळणीच्या वेदना, १९८४च्या दंगलीच्या झळा आणि त्यातून पुन्हा उभा राहिलेला पंजाब अशा अनेक बाबींचा समावेश होता. या सादरीकरणाने सर्व उपस्थितांचे अंतःकरण हेलावून गेले.

31 MAY 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कलाविष्कारातून उमटले एकतेचे सूर

## शिवाजी विद्यापीठात पंजाबच्या लव्हली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे सुंदर सादरीकरण

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ३० : यमन रागामधील मराठी, हिंदी भाषेतील सुरेल गाणी, प्रेम भावनेची आर्तता दाखणारी कव्वाली, मराठीचे सांस्कृतिक वैभव दाखवणारी महाराष्ट्राची लोकधारा आणि अस्सल पंजाबी भांगडा अशा वैविध्यपूर्ण कलाप्रकारांचे सादरीकरण आज विद्यापीठात झाले. पंजाबमधील लव्हली विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कलाकारांनी येथील जिजामाता सभागृहात आज 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग' या सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत हे कलाप्रकार सादर केले. दोन राज्यांतील कलाकारांच्या या कार्यक्रमामुळे एकतेचे सूर उमटले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी पंजाबमधील लव्हली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भांगडा नृत्य सादर केले.**

पंजाबच्या लव्हली विद्यापीठाचे विद्यार्थी दोन दिवसांपूर्वी कोल्हापुरात दाखल झाले. आज या उपक्रमाच्या औपचारिक उद्‌घाटन समारंभानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाच्या सादरीकरणास सुरवात झाली. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या गणेश वंदनेने कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यानंतर लव्हली विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी 'नूर-ए-ईश्क' हा कव्वाली कार्यक्रम सादर केला. प्रेमाची विविध रुपे दाखविणाऱ्या अनेक लोकप्रिय आणि



प्रसिद्ध कव्वालांच्या आवाजाने अजरामर केलेल्या कव्वालींचे फ्युजन सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले आणि कार्यक्रमात सुवातीलाच अनोखा रंग भरला. त्यानंतर पारंपरिक पंजाबी लोकनृत्याचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. कृषीसंस्कृतीशी असणारे या नृत्याचे जवळचे नाते त्यांनी याद्वारे उलगडून दाखविले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी भारतीय लोकवाद्यवृंद सादर केला. यामध्ये महाराष्ट्र व पंजाबसह राजस्थान, मध्य प्रदेश, तेलंगणा, गुजरात, छत्तीसगढ, हरियाणा, तमिळनाडू या राज्यांतील विविध वाद्ये, नृत्ये आणि गीते असे तिहेरी सादरीकरण केले.

या बहारदार सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर पंजाबच्या संघानेही त्रिवेणी लोकवाद्यवृंद सादर केला. यामध्ये पंजाबी गीते, वाद्ये आणि नृत्य असा तिहेरी संगम साधला आणि या पंजाबी संस्कृतीशी उपस्थित मनाने जोडले गेले. पंजाबच्या संघाने त्यानंतर 'दिल दा मामला' या प्रहसनपर लघुनाटिकेतून आजच्या वास्तवावर झगझगीत प्रकाश टाकून उपस्थितांना हसवता हसवता अंतर्मुख केले. अखेरीस 'मैं पंजाब बोलदा' या लघु-सांगितिकेच्या माध्यमातून पंजाबचे अत्यंत अप्रतिम आत्मवृत्त विद्यार्थ्यांनी सादर केले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. नीलेश सावे, परीक्षा नियंत्रक जी. आर. पळसे, डॉ. आर. व्ही. गुरव, व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. बलप्रीत सिंह यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

### 'योगदान द्या'

भारतातील विद्यार्थी अन्य देशांत जावून शिकतात. जगाच्या पाठीवर कोठेही शिका मात्र देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी नेहमी सज्ज रहावे. देशातील विविध समस्यांवर उपाय शोधण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यासाठी उत्तर शोधणाचा दृष्टिकोन स्वतःमध्ये निर्माण करा, असे आवाहन लव्हली विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे अधिष्ठाता डॉ.सौरभ लखनपाल यांनी उद्‌घाटनप्रसंगी केले.

31 MAY 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात 'झूमर' लोकनृत्यावर धरला ठेका

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील 'महाराष्ट्र के रंग पंजाब के संग" सांस्कृतिक कार्यक्रमाला गणेश वंदनेने सुरूवात झाली. कव्वाली, शास्त्रीय गायनाने रंगत आणली. लव्हली युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांनी झूमर, भांगडा नृत्यातून एकतेचे दर्शन घडवले. महाराष्ट्रीयन पंजाबी लोकनृत्याच्या तालावर ठेका धरला.

आजादी का अमृतमहोत्सव आणि शिवाजी विद्यापीठाचा हिरक महोत्सव अशा संयुक्त निमित्ताने आयोजित 'महाराष्ट्र के रंग, पंजाब के संग" उपक्रमाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विद्या शाखेचे वरिष्ठ अधिष्ठाता प्रा. सौरभ लखनपाल यांच्या हस्ते झाले. राजमाता जिजाऊ सभागृहात कार्यक्रम पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी गर्दी केली होती. पंजाबी कलाकारांनी झूमर व भांगडा नृत्य करीत स्थानिक संस्कृतीचे दर्शन घडवले. पंजाब व शिवाजी विद्यापीठातील कलाकारांनी 'यमक कल्याण" रागावर आधारीत विविध प्रांतातील, वीस गाण्यांचे मुखडे सादर केले. 'नूर-ए-ईश्क" कव्वालीच्या सादरीकरणाने रंगत आणली. शिवाजी विद्यापीठाच्यावतीने महाराष्ट्रातील इंडियन फोक ऑर्केस्ट्राच्या सादरीकरणाने मंत्रमुग्ध केले. पंजाब व महाराष्ट्रातील लोकसंस्कृतीबरोबर विविध लोककलांचे महत्व सांगितले. कला, संगीताला कोणतीही भाषा नसते, असा संदेश यातून दिला, शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी प्रास्ताविक केले. व्हॅलेंटिना भार्गव यांनी सूत्रसंचालन केले. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी आभार मानले. यावेळी लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे उपअधिष्ठाता डॉ. बलप्रीत सिंह, विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, संघ व्यवस्थापक डॉ. नीलेश सावे उपस्थित होते.




कोल्हापूर : लोकनृत्य सादर करताना पंजाब लव्हली विद्यापीठाचे विद्यार्थी.

- महाराष्ट्र के रंग पंजाब के संग अंतर्गत विद्यापीठात सांस्कृतिक मेजवानी
- लोकनृत्यातून देशाच्या एकतेचे दर्शन

### मै पंजाब बोलदा

अखेरीस 'मैं पंजाब बोलदा" या लघु-सांगितिकेच्या माध्यमातून पंजाबचे आत्मवृत्त विद्यार्थ्यांनी सादर केले. या कहानीमध्ये निर्मितीपासून ते भारताच्या जडणघडणीमधील त्यांचे योगदान, फाळणीच्या वेदना, १९८४ च्या दंगलीच्या झळा, त्यातून पुन्हा उभा राहिलेला पंजाब आदी बाबींचा समावेश होता.

तरुण भारत

# 'विद्यापीठाचा विद्यार्थी न्यायमुर्ती होणे ही अभिमानास्पद गोष्ट'

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी अमित बोरकर यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती होणे, ही विद्यापीठ परिवाराबरोबरच समस्त कोल्हापूरवासीयांसाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले. मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. अमित बोरकर यांचा विद्यापीठाच्या वतीने सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असलेल्या न्या. बोरकर यांनी विद्यापीठाच्या वकीलांच्या पॅनलवरही अत्यंत प्रभावी पद्धतीने काम केले. आपल्या कर्तबगारीच्या बळावर त्यांनी न्यायमूर्ती पदापर्यंत झेप घेतलेली आहे. त्यांच्या या कार्यकर्तृत्वाचा विद्यापीठ परिवारास अभिमान वाटतो. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विद्यापीठाचे वकील म्हणून काम केल्यानंतर पुढे न्यायमूर्ती होण्याची एक परंपरा निर्माण झाली आहे. अगदी सर्वोच्च न्यायालयही त्यास अपवाद राहिलेले नाही. त्यातही न्या. बोरकर हे विद्यापीठाचे विद्यार्थी असल्याचा आनंद वेगळा आहे.

न्या. बोरकर सत्कारास उत्तर देताना म्हणाले, विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याचा अभिमान सदैव माझ्या मनात आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाचा वकील म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली, विद्यापीठाप्रती निष्ठा, प्रामाणिकपणा आणि कष्टाळू वृत्ती हे येथील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे गुणवैशिष्ट्य मला भावले. स्वागत व प्रास्ताविक प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. विधी अधिकारी ॲड. अनुष्का कदम यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी विभा अंत्रेडी उपस्थित होते.